04 SEP 2022


सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. कामत यांची कुलगुरुपदी निवड प्रेरणादायक

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के; शिवाजी विद्यापीठात रंगला शुभेच्छा समारंभ

**कोल्हापूर, ता. ३ :** डॉ. आर. के. कामत यांची डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाच्या कुलगुरुपदी झालेली निवड आनंदाची, अभिमानाची व प्रेरणादायक गोष्ट आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. कुलगुरू डॉ. कामत यांची डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाच्या कुलगुरुपदी निवड झाल्याबद्दल शिवाजी विद्यापीठात आयोजित शुभेच्छा समारंभात ते बोलत होते. राजर्षी शाहू सभागृहात कार्यक्रम झाला.




**कोल्हापूर : डॉ. आर. के. कामत यांची डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाच्या कुलगुरुपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आदी.**

डॉ. शिर्के म्हणाले, ''डॉ. कामत यांनी शिवाजी विद्यापीठात सायबर सिक्युरिटी सेंटरची स्थापना केली. राष्ट्रीय पातळीवरील नवीन उपक्रम राबवून नवीन कोर्स सुरू केले. दिलेली जबाबदारी ही मोठीच असते, कमी-जास्त अशी काही नसते. कामाची हाताळणी करण्याची कला अवगत असणे आवश्यक आहे. चांगली कामे करणाऱ्यांना उत्तम संधी प्राप्त होते. काम करण्याची अभिजात वृत्ती त्यांच्याकडे आहे.''

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, ''विविध विभागांची जबाबदारी स्वीकारून एक चांगली संस्कृती आणि परंपरा डॉ. कामत यांनी विद्यापीठात निर्माण केली. विद्यापीठातील ज्ञानाची शिदोरी घेऊन ते डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठात कुलगुरूपदी कार्यरत झाले आहेत.''

डॉ. कामत म्हणाले, ''माझ्या जडण-घडणीत शिवाजी विद्यापीठाचे मोठे योगदान आहे. विद्यापीठाच्या सक्षम प्रशासनाचा राज्यात नावलौकिक आहे. प्रशासनात संवाद व लेखन महत्त्वाचा भाग आहे. तो आपण आत्मसात केला पाहिजे.''

नॅनोसायन्स विभागाचे डॉ. पी. जे. कसबे, इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे डॉ. एम. के. भानारकर यांनी मनोगत व्यक्त केले. मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. एस. देशमुख, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. अण्णासाहेब गुरव, इनक्युबेशन सेंटरचे सीईओ डॉ. पी. डी. राऊत, क्रीडा अधिविभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. व्ही. जे. फुलारी, डॉ. नंदकुमार मोरे उपस्थित होते. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

04 SEP 2022 तरुण भारत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जिल्ह्यात ३६ ठिकाणी स्टार्टअप यात्रा

## विद्यार्थ्यांच्या नवसंकल्पनांना संधी - कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के

**प्रतिनिधी**

कोल्हापूर

राज्यातील नाविन्यपूर्ण संकल्पना आणि नवउद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी मार्फत स्टार्टअप यात्रेचे शिवाजी विद्यापीठात आगमन झाले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी झेंडा फडकवून यात्रेचे स्वागत केले. जिल्ह्यात ३६ ठिकाणी स्टार्टअप यात्रा जाणार आहे. यातून विद्यार्थ्यांच्या नवसंकल्पनांना संधी असल्याचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगितले.

यावेळी डॉ. राजनिश कामत, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित व लेखअधिकारी अजीत चौगुले, नवोपक्रमचे संचालक डॉ. एम. एस.



**कोल्हापूर : स्टार्टअप यात्रेला झेंडा दाखवताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनिश कामत, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी.**

देशमुख, डॉ. सरिता ठकार, डॉ. पी. डी. राऊत उपस्थित होते.

**स्टार्टअपच्या उत्तम संकल्पनेला एक लाखाचे अनुदान : डॉ. देशमुख**

१६ सप्टेंबर रोजी विद्यापीठात जिल्हास्तरीय प्रशिक्षण शिबिर व सादरीकरण स्पर्धा होतील. प्रत्येक सादरीकरण सत्रातील उत्तम १० कल्पनांचे राज्यस्तरीय सादरीकरण तज्ज्ञ समितीसमोर विजेत्यांची नावे जाहीर होतील. राज्यस्तरीय विजेत्यांना १ लाखांचे अनुदान देण्यात येणार आहे.

04 SEP 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्टार्टअप यात्रेच्या माध्यमातून नवसंकल्पना, व्यवसायाच्या संधी

## कुलगुरू डॉ. शिर्के

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र स्टार्टअप यात्रा हे महाराष्ट्र सरकारने पुढे टाकलेले पाऊल आहे. स्टार्टअप यात्रेच्या माध्यमातून नवसंकल्पना, नवीन व्यवसायाच्या संधी निर्माण होतील, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी.टी.शिर्के यांनी केले.

राज्यातील नावीन्यपूर्ण संकल्पना व नवउद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीमार्फत स्टार्टअप यात्रेचे आगमन शनिवारी शिवाजी विद्यापीठात झाले. यात्रेचे स्वागत झेंडा फडकवून कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

कुलगुरू शिर्के म्हणाले, १५ ऑगस्ट पासून सुरू झालेल्या यात्रेने जिल्ह्यात आतापर्यंत ३६ ठिकाणी भेटी दिल्या आहेत. त्यात ३० स्टार्टअपची नोंद झाली आहे. यात्रेचे मार्गदर्शक प्रद्युम्न आढाव, जिल्हा कौशल्य विकास केंद्राचे असिस्टंट कमिशनर संजय माळी यांनी स्टार्टअप व शासनाच्या विविध योजनांबाबत माहिती दिली. यात्रेच्या स्वागतासाठी डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनिश कामत, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, नवोपक्रमचे संचालक डॉ. एम. एस. देशमुख, अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, इनक्युबेशन सेंटरचे सीईओ डॉ. पी. डी. राऊत, कौशल्य विकासचे संचालक डॉ. ए. एम. गुरव उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात स्टार्टअप यात्रेचे आगमन झाल्यावर झेंडा फडकवून स्वागत करताना कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के. प्र-कुलगुरू डॉ.पी.एस.पाटील, कुलगुरू डॉ. आर.के.कामत, प्र.कुलसचिव डॉ. व्ही.एन.शिंदे, डॉ. पी.डी.राऊत आदी.**

**एक लाखाचे अनुदान मिळणार..**

यात्रेबाबतची संपूर्ण माहिती, नावीन्यपूर्ण संकल्पना, त्याच्या इतर पैलूंची माहिती देण्यात येत आहे. १६ सप्टेंबर रोजी विद्यापीठात जिल्हास्तरीय प्रशिक्षण शिबिर व सादरीकरण स्पर्धा होईल. नोंदणी केलेल्या नवउद्योजकांच्या संकल्पनांच्या सादरीकरणासाठी स्पर्धा होतील. जिल्हास्तरावर सर्वोत्तम कल्पना सादर करणाऱ्यांना २५ हजार रुपयांपर्यंतचे पारितोषिक दिले जाणार आहे. प्रत्येक सादरीकरण सत्रातील उत्तम दहा कल्पनांचे राज्यस्तरीय सादरीकरण तज्ज्ञ समितीसमोर करण्यात येईल. राज्यस्तरीय विजेत्यांना १ लाख रुपयांपर्यंतचे रोख अनुदान व आवश्यक पाठबळ पुरवण्यात येणार आहे.

04 SEP 2022 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नव्या कल्पनेतूनच स्टार्टअपची सुरुवात

## डॉ. डी. टी. शिर्के; शिवाजी विद्यापीठात स्टार्टअप यात्रेचे स्वागत

**कोल्हापूर, ता. ३ :** आजूबाजूला असलेल्या अडचणी दूर करण्याच्या माध्यमातूनच नव्या कल्पना जन्माला येतात. यातून नवे स्टार्टअप सुरू होतात. यासाठी शासनाने सुरू केलेल्या महाराष्ट्र स्टार्टअप यात्रा-२०२२ मध्ये तुमची लहानशी कल्पना असेल, तर आवर्जून नोंदवा, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. शिवाजी विद्यापीठात राज्य नावीन्यता सोसायटीतर्फे 'स्टार्टअप यात्रा - २०२२' चे आज आगमन झाले. त्याप्रसंगी ते बोलत होते. त्यांनी व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी झेंडा फडकवून यात्रेचे स्वागत केले.



**कोल्हापूर : 'स्टार्टअप यात्रा - २०२२'चे झेंडा फडकवून स्वागत करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. शेजारी कुलगुरू डॉ. आर. के. कामत, डॉ. व्ही. एन. शिंदे, अजित चौगुले.**

यात्रेने जिल्ह्यात आतापर्यंत ३६ ठिकाणी भेटी दिल्या असून, त्यात ३० स्टार्टअपची नोंद झाली आहे. यात्रेने आज विद्यापीठात सुरू असणाऱ्या 'एसयुके रिसर्च अँन्ड डेव्हलपमेंट फाउंडेशन' या इनक्युबेशन सेंटरला भेट दिली व समाधान व्यक्त केले. त्यानंतर यात्रेचे मार्गदर्शन प्रद्युम्न आढाव व जिल्हा कौशल्य विकास केंद्राचे असिस्टंट कमिशनर संजय माळी, कौशल्य विकास अधिकारी श्रीमती मोटे यांनी विविध योजनांबाबत माहिती दिली. यात्रेच्या स्वागतासाठी डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखअधिकारी अजित चौगुले, नवोपक्रमचे संचालक डॉ. एम. एस. देशमुख, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, इनक्युबेशन सेंटरचे सीईओ डॉ. पी. डी. राऊत, कौशल्य विकासचे संचालक डॉ. ए. एम. गुरव उपस्थित होते.

लोकमत



शाहू स्मारक भवनात मंगळवारी दलितमित्र व्यंकाप्पा भोसले लिखित 'शाहू महाराज आणि भटके विमुक्त' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. यावेळी शाहू छत्रपती, डॉ. डी. टी. शिर्के, व्यंकाप्पा भोसले, प्रा. सुनील भोसले उपस्थित होते.

# 'शाहू महाराज आणि भटके विमुक्त' पुस्तकाचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** येथील दलितमित्र व्यंकाप्पा भोसले लिखित 'शाहू महाराज आणि भटके विमुक्त' या पुस्तकाचे प्रकाशन मंगळवारी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. शाहू छत्रपती अध्यक्षस्थानी होते. शाहू स्मारक भवनात कार्यक्रम झाला.

करवीर संस्थानचे राजे राजर्षी शाहू महाराज यांचे स्मृति शताब्दी वर्ष आणि ३१ ऑगस्ट १९५३ रोजी भटक्या, विमुक्त जमातींना स्वातंत्र्य मिळाले त्यानिमित्त भोसले लिखित शाहू महाराज आणि भटके विमुक्त या पुस्तकाचा प्रकाशन कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के, शाहू छत्रपती, इतिहास संशोधक प्रा. डॉ. रमेश जाधव, प्रा. डॉ. टी. एस. पाटील, प्रा. डॉ. अरुण शिंदे यांची भाषणे झाली. यावेळी वसंतराव मुळीक, चंद्रकांत यादव, प्राचार्य विलास पोवार, ॲड. गुलाबराव घोरपडे, प्रा. सुनील भोसले आदी उपस्थित होते.

लोकसत्ता

# डॉ. व्ही. एन. शिंदे यांना चिपळोणकर पुरस्कार

**कोल्हापूर :** इंडियन फिजिक्स असोसिएशन या संस्थेच्या पुणे विभागाचा मराठीतून विज्ञान प्रसाराच्या कार्यासाठी देण्यात येणारा प्रतिष्ठेचा प्रा. मो. वा.



चिपळोणकर पुरस्कार शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव तथा विज्ञान साहित्यिक डॉ. व्ही. एन. तथा विलास शिंदे यांना जाहीर झाला आहे. ५ सप्टेंबर रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागामध्ये ज्येष्ठ साहित्यिक रंगनाथ पठारे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान समारंभ होणार आहे. इंडियन फिजिक्स असोसिएशनचे अध्यक्ष प्रा. डॉ. संजय ढोले आणि सचिव डॉ. विकास मठे यांनी ही माहिती शुक्रवारी दिली. डॉ. शिंदे यांनी विज्ञान साहित्य, कार्यशाळा आणि ललित लेखनाद्वारे केलेले विज्ञानप्रसाराचे कार्य विशेष आहे. यापूर्वी हा पुरस्कार डॉ. जयंत नारळीकर, निरंजन घाटे, सुबोध जावडेकर, डॉ. पंडित विद्यासागर, डॉ. अनिल लचके, डॉ. सुनील विभुते यांना देण्यात आला आहे. डॉ. शिंदे यांची एककांचे मानकरी, असे घडले भारतीय शास्त्रज्ञ, हिरव्या बोटांचे किमयागार आणि आवर्तसारणी व मूलद्रव्यांची दुनिया ही पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

पुढारी

# डॉ. व्ही. एन. शिंदे यांना चिपळोणकर पुरस्कार जाहीर



**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

इंडियन फिजिक्स असोसिएशन संस्थेच्या पुणे विभागाच्या वतीने मराठीतून विज्ञान प्रसाराच्या कार्यासाठी देण्यात येणारा प्रतिष्ठेचा प्रा. मो. वा. चिपळोणकर पुरस्कार-२०२२ शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव तथा विज्ञान साहित्यिक डॉ. व्ही. एन. तथा विलास शिंदे यांना जाहीर झाला आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागामध्ये दि. ५ सप्टेंबर रोजी दुपारी ४ वाजता ज्येष्ठ साहित्यिक रंगनाथ पठारे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान समारंभ होणार आहे. इंडियन फिजिक्स असोसिएशनचे अध्यक्ष प्रा. डॉ. संजय ढोले आणि सचिव डॉ. विकास मठे यांनी ही माहिती पत्राद्वारे कळविली आहे. डॉ. शिंदे यांनी विज्ञान साहित्य, कार्यशाळा व ललित लेखनाद्वारे केलेले विज्ञानप्रसाराचे कार्य विशेष उल्लेखनीय असल्याचे यात नमूद करण्यात आले आहे. डॉ. शिंदे यांची 'एककांचे मानकरी', 'असे घडले भारतीय शास्त्रज्ञ', 'हिरव्या बोटांचे किमयागार' आणि 'आवर्तसारणी व मूलद्रव्यांची दुनिया' ही पुस्तके प्रकाशित झाली आहेत. या पुरस्काराबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी डॉ. शिंदे यांचे अभिनंदन केले आहे.

पुढारी

# वि. स. खांडेकर यांना अभिवादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

ज्ञानपीठ पुरस्कार विजेते ज्येष्ठमराठी साहित्यिक वि.स. खांडेकर यांच्या ४६ व्या स्मृतिदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात त्यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करण्यात आले.

विद्यापीठातील वि.स.खांडेकर स्मृती संग्रहालय येथे भावपूर्ण वातावरणात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते वि.स. खांडेकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी प्र- कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांच्यासह खांडेकर स्मृती संग्रहालयाच्या संचालक डॉ. नीलांबरी जगताप, मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे आदी उपस्थित होते.

पुढारी

# विद्यापीठाकडून आजअखेर २३६ परीक्षांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मार्च-एप्रिल २०२२ उन्हाळी सत्र परीक्षेतंर्गत आजअखेर सुमारे २३६ परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत. विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षांना प्रारंभ झाला आहे. शनिवारपर्यंत एम.आर्कि., बी.फार्मसी, बीसीए, बीएड. आदी अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले. दरम्यान, आज बीए, एमबीए विषयाच्या परीक्षा झाल्या असून सुमारे ५ हजार विद्यार्थी परीक्षेला बसले. विद्यार्थ्यांनी विद्यापीठाने दिलेल्या परीक्षा नियमावली, सूचनांचे पालन करावे, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

04 SEP 2022
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात टूर अँड ट्रॅव्हल विभाग

## महिनाअखेर केंद्र सरकारला प्रस्ताव पाठविणार; कोल्हापूरच्या पर्यटनास मिळणार चालना

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**



पुढारी विशेष

निसर्गसमृद्ध, विविधतेने नटलेली कलानगरी, दक्षिण काशी म्हणून कोल्हापूरची ओळख आहे. जिल्ह्यात तीन हजारांहून अधिक हेरिटेज स्पॉट आहेत. याठिकाणी स्थानिकसह राज्य व इतर राज्यातील पर्यटक भेटी देतात. परंतु, कोल्हापूर शहर, पन्हाळा व आंबा सोडल्यास इतर ठिकाणी फार पर्यटन सुविधा उपलब्ध नाहीत. शिवाजी विद्यापीठाने टूर अँड ट्रॅव्हल अधिविभाग सुरू करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. केंद्र सरकारकडून निधी मिळाल्यास कोल्हापूरच्या पर्यटनासाठी मोठा हातभार लागून चालना मिळणार आहे.

औरंगाबाद विद्यापीठ वगळता इतर सर्व विद्यापीठांत टूर अँड ट्रॅव्हल अभ्यासक्रम पूर्णवेळ शिकविणारा अधिविभाग नाही. शिवाजी विद्यापीठाने २००६ मध्ये पर्यटन व प्रवास पदविका अभ्यासक्रम सुरू केला. त्यातून हजारो विद्यार्थ्यांना रोजगार मिळाला आहे. सहा महिन्यांपूर्वी विद्यापीठाने सर्टिफिकेट कोर्स इन टूरिस्ट गाईड हा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्यामार्फत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास पाठविला आहे. त्याबाबतचा निर्णय अद्याप झालेला नाही.

कोल्हापूरच्या पर्यटनवाढीच्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठाने मास्टर इन टुरिझम अँड ट्रॅव्हल मॅनेजमेंट हा दोन वर्षे कालावधीचा अभ्यासक्रम सुरू करण्याचा प्रस्ताव तयार केला आहे. महिनाअखेरीस तो केंद्रीय पर्यटन मंत्रालयास सादर केला जाणार आहे. त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध झाल्यास शिवाजी विद्यापीठात टूर अँड ट्रॅव्हल विभाग नव्याने सुरू करता येणार आहे.

जिल्ह्यात खास पर्यटनासाठी दरवर्षी लाखो पर्यटक येतात. ते केवळ अंबाबाईचे दर्शन घेऊन कोकण व इतर ठिकाणी जातात. त्यांना पर्यटनस्थळाची माहिती देण्यासाठी 'एमटीडीसी'ची कार्यालये नाहीत. कोल्हापूरमध्ये हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच टुरिस्ट गाईड उपलब्ध आहेत. परंतु लाखो पर्यटक कोल्हापूरमध्ये येतात. त्यांच्यासाठी ही संख्या खूप कमी आहे. या सर्व घटकांसाठी जिल्ह्यात टुरिस्ट सेक्टरमध्ये काम करायला लोकांना योग्य प्रशिक्षण देईल, असा पर्यटन विभाग असणे गरजेचे आहे.

### टूर प्लॅनरची गरज

कोल्हापूर जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून विकसित होऊ शकतो. सह्याद्रीचा भाग असलेले चंदगड, भुदरगड, गगनबावडा, आजरा हे तालुके दुर्लक्षित आहेत. शाहूवाडी, पन्हाळा ऐतिहासिक व नैसर्गिक ठिकाणांसाठी प्रसिद्ध आहेत. या ठिकाणी पर्यटन आहे, पण ते नियोजनबद्ध नाही. स्थानिक लोक संस्कृती, निसर्ग व सामाजिक घटकांचे मूळ माहिती स्रोत आहेत. ते उत्तम गाईड म्हणून काम करू शकतात. त्यांना प्रशिक्षणाची आवश्यकता आहे. पर्यटकांना त्यांच्या आवडीनुसार व कोणती ठिकाणे पाहावीत ही माहिती देण्यासाठी 'टूर प्लॅनर' असणे गरजेचे आहे.

"

कोल्हापूरसह राज्यातील सर्व ठिकाणच्या पर्यटन विकासासाठी मोठा वाव आहे. मात्र, पर्यटनाकडे व्यवसाय म्हणून पाहण्याची दृष्टी राज्यकर्ते व जनतेकडे नाही. राज्यात हजारो परदेशी व इतर राज्यांतील पर्यटक येतात. मात्र, मोजक्या ठिकाणांना भेट देतात. पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या सर्व ठिकाणांना जगाच्या नकाशावर आणण्यासाठी राज्य सरकारने शर्थीचे प्रयत्न केल्यास पर्यटन वाढून रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील.

**- प्रा. डॉ. मीना पोतदार,** समन्वयक, पर्यटन व प्रवास केंद्र, शिवाजी विद्यापीठ

सकाळ

# बी.ए., एम.बी.ए. परीक्षा सुरळीत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा विभागातर्फे बी. ए., एम.बी.ए. अभ्यासक्रमाची परीक्षा शनिवारी (ता. ३) झाली. एकूण पाच हजार २० विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. दरम्यान, दहा परीक्षांचे निकालही जाहीर केले. आजपर्यंत एकूण २३६ परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत. विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. पथकांकडून परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर गैरप्रकार म्हणून प्रत्यक्ष नोंद करून परीक्षा प्रमाद समितीतर्फे नियमानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी म्हटले आहे.

तरुण भारत

# विद्यापीठ परीक्षा सुरळीत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील ५६१ परीक्षा सुरू आहेत. त्यापैकी शनिवारी बी. ए., एम.बी.ए. अभ्यासक्रमाच्या चार विषयांच्या परीक्षा पार पडल्या. ही परीक्षा ५ हजार २० विद्यार्थ्यांनी दिली. आतापर्यंत २३६ परीक्षांचे निकाल जाहीर झाले. परीक्षा सुरळीत पार पडण्यासाठी भरारी पथकांची नेमणूक केली आहे, तरी विद्यार्थ्यांनी विद्यापीठ नियमानुसार ही परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.